प्रसिद्धी

# कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई

---

## रेमडेसीवीर इंजेक्शन विकणारी टोळी कोपरखैरणे पोलीसांनी केली गजाआड.

---ooo---

कोपरखैरणे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप तिदार यांना खात्रीशिर बातमी मिळाली होती की, इसम नामे समीर गणपत चांदोरकर हा **REMDESIVIR INJECTION** चा काळा बाजार करीत असुन तो एक रेमडिसेवर इंजेक्शन प्रत्येकी विस हजार रूपायाना विकत आहे. त्या अनुषंगाने त्याला पकडण्यासाठी कोपरखैरणे पोलीस ठाणेकडुन दिनांक २३/०४/२०२१ रोजी सापळा रचण्यात आला होता. सदरच्या सापळयात श्री. प्रविण बबन हांगे व श्री. प्रसाद घोरपडे यांना बोगस कस्टमर म्हणुन पाठविण्यात आले होते. त्याप्रमाणे इसम नामे समीर गणपत चांदोरकर रा. डोबिवली यास कोपरखैरणे, सेक्टर कमांक १५, नवी मुंबई येथे ४ रेमडेसीविर इंजेक्शनची विक्री करीत असताना रंगेहात पकडण्यात आले. त्याचेकडुन ४ रेमडेसीविर इंजेक्शन एक अॅक्टीव्हा मोटार सायकल, एक मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकुण रू. ६८,५००/- किंमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूध्द कोपरखैरणे पोलीस ठाणेकडे गु.रजि.नं. १२७/२०२१ प्रमाणे नोंद आहे. सदर गुन्हयाचे तपासात सौ. वंदना उमेश जाधव व भिवसन उर्फ विनोद विक्रम पाटील दोघेही रा. डोंबिवली यांचा सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना देखील सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील ३ आरोपी सध्या पोलीस कोठडीत असुन सपोनि निलेश धुमाळ हे त्यांच्याविरूध्दच्या गुन्हयाचा अधिक तपास करीत आहेत.

मा. पोलीस आयुक्त,श्री. बिपीन कुमार सिंह, मा. सह पोलीस आयुक्त, डॉ. श्री. जय जाधव, मा. पोलीस उप आयुक्त, परि. १, वाशी, नवी मुंबई.श्री सुरेश मेंगडे, मा. सहायक पोलीस आयुक्त, वाशी विभाग, नवी मुंबई, श्री. विनायक वस्त यांचे मार्गदर्शनाखाली कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप तिदार, पोलीस निरीक्षक, श्री. गजानन कदम, स.पो.निरी. श्री. निलेश येवले, सपोनि श्री. योगेश गायकवाड, स.पो.निरी श्री. निलेश धुमाळ,पोलीस अंमलदार पो.हवा/२०७५ गणपत पवार पवार, पोना/२१८२ साईनाथ सोनवणे, पोशि/१२०२७, महेश गावडे, पो.शि/२९२८ गणेश चौधरी, पो.शि/३२७० किरण बुधवंत, व पो.शि/१२१२२ शंकर भांगरे यांनी महत्वाची कामगिरी बजावली असुन **REMDESIVIR INJECTION** चा काळा बाजार करणारे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.


महाराष्ट्र पोलीस
कोपरखैरणे पोलीस ठाणे
नवी मुंबई पोलीस
महाराष्ट्र पोलीस
नवी मुंबई पोलीस